# शाश्वत परिवर्तन: फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशन २०१९ पासून उस्मानाबादमधील विधवा महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करत आहेत

उस्मानाबाद, १० जून,२०२३: फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडची सीएसआर शाखा मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) उस्मानाबादच्या रखरखीत भूमीत, जिथे दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या यामुळे निराशेची छाया पडली आहे, विधवा महिला व शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करून त्यांच्या जीवनात आशेचे किरण आणत आहे. सामाजिक उत्तरदायित्वाप्रती मनापासून बांधिलकी ठेवून, मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) ने समाजाला भेडसावणारा संघर्ष कमी करण्यासाठी एक परिवर्तनात्मक प्रवास सुरू केला आहे.



२०१९ मध्ये मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) ने स्थानिक एनजीओ साई मित्र परिवारासोबत सहभागीदारी करून सर्वसमावेशक गरजांचे सर्वेक्षण व मूल्यांकन केले. त्या सर्वेक्षणामध्ये उस्मानाबादमधील दुष्काळ आणि परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या या कारणामुळे विधवांची लक्षणीय संख्या वाढल्याचे उघडकीस आले. पर्याय फाऊंडेशनच्या पाठिंब्याने मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) ने या विधवा महिलांना मदत करण्याच्या उद्देशाने एक प्रकल्प सुरू केला आणि आतापर्यंत एकूण ४१२ लाभार्थ्यांना त्यामुळे मदत झाली.

या प्रकल्पात विधवांना आवश्यक सहाय्य प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले होते. ज्यात भूसंपादन, कृषी विज्ञान केंद्राद्वारे शेती तंत्राचे प्रशिक्षण आणि त्यांची विपणन आणि किंमत ठरवण्याची कौशल्ये वाढवणे समाविष्ट होते. या प्रशिक्षणामुळे त्यांनी केलेले उत्पादन जवळच्या बाजारपेठांमध्ये यशस्वीरित्या विकले गेले, ज्यामुळे ६०३ महिला स्वावलंबी बनल्या आणि त्यांच्या मुलांना शाळेत पाठवून शकल्या आणि त्यांचे कर्ज प्रभावीपणे व्यवस्थापित करू शकले. २०२३ पर्यंत सहाय्य केलेल्या विधवांची संख्या ४२४ या प्रभावी आकड्यापर्यंत गेली आहे आणि त्यापैकी ३४९ जणांना कार्यक्रमाद्वारे स्वावलंबन आणि स्वातंत्र्य मिळाले आहे; तर त्यांच्यापैकी ७५ जणांना अजूनही पाठिंब्याची आणि मदतीची गरज आहे. या यशाने प्रेरित होऊन, मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) ने अतिरिक्त ३४९ गरजवंत विधवा महिलांना हेरले आहे ज्यांना या प्रकल्पाच्या माध्यमातून सर्वसमावेशक समर्थनाचा लाभ घेता येईल. त्यामुळे सध्याचा सहाय्य मिळवत असलेल्या महिलांचा आकडा एकूण ४२४ वर पुन्हा आला आहे.

सध्या चालू असलेल्या सशक्तीकरणाच्या प्रयत्नांबरोबर मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) ने १ जून रोजी बियाणे वाटपाचा कार्यक्रम सुद्धा आयोजित केला होता, ज्यामुळे या प्रदेशातील विधवा महिलांना पुरविण्यात येणाऱ्या मदतीला अधिक चालना मिळाली. या कार्यक्रमाचा उद्देश विधवा महिलांना आवश्यक कृषी संसाधनांनी सुसज्ज करणे आणि त्यांना त्यांची शेतीची कामे सुरू करण्यास सक्षम करणे हा आहे. बियाणे आणि आवश्यक मार्गदर्शन देऊन एमएमएफ (एमएमएफ) त्यांना शेती विषयक क्षमता वाढवण्याचा आणि त्यांनी दीर्घकाळ शेती उद्योगात टिकून राहावे व प्रगती करावी यासाठी योगदान देण्याचा प्रयत्न करत आहे. मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सुश्री रितु छाब्रिया महिलांचे सक्षमीकरण आणि शाश्वत बदल घडवण्यासाठी संस्थेच्या वचनबद्धतेवर भर देत म्हणाल्या, 'या विधवा महिलांच्या जीवनातील सकारात्मक परिवर्तनाचे साक्षीदार असल्याचा आम्हाला अभिमान आहे. त्यांना सर्वसमावेशक आधार प्रदान करणे, त्यांना स्वावलंबी बनण्यास सक्षम करणे आणि स्वतःसाठी व त्यांच्या कुटुंबासाठी एक उत्तम भविष्य सुरक्षित करणे हा आमचा दृष्टिकोन आहे.'